# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी




● कृषि माहिती वाहिनी : (०२४५२) २२९०००, मो. ८३२९४३२०९७, ई-मेल : deevnmkv@gmail.com, deemau@rediffmail.com ● फोन : (०२४५२) २२८६०१
● विद्यापीठ संकेत स्थळ : www.vnmkv.ac.in विद्यापीठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com /vnmkv /vnmkv /user/vnmkv


## २ फेब्रुवारी — माघ/फाल्गुन शके १९४७ — २०२६

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | **माघ पौर्णिमा** शुभ दिवस<br>माघस्नान समाप्ती (सायं. ४.४३ नं.)<br>पौर्णिमा प्रारंभ पहाटे ०५.५२<br>पौर्णिमा समाप्ती उ.रात्रौ ३.३८<br>**१** | माघ कृ. ७ शुभ दिवस<br>भानुसप्तमी (दु.३.५४ नं.)<br>श्री गजानन महाराज प्रकट दिन<br>**८** | माघ कृ. १३<br>संत सेवालाल महाराज जयंती<br>**महाशिवरात्री**<br>**१५** | फाल्गुन शु. ५ शुभ दिवस<br>**२२** | |
| सो सोमवार | माघ कृ. १ शुभ दिवस<br>गुरूप्रतिपदा<br>**२** | माघ कृ. ८<br>कालाष्टमी<br>**९** | माघ कृ. १४<br>सोमवती अमावास्या<br>सायं. ०५.३३ पासून<br>अमावास्या प्रारंभ सांय. ०५.३३<br>**१६** | फाल्गुन शु. ६<br>संत गाडगे महाराज जयंती<br>**२३** | |
| मं मंगळवार | माघ कृ. २ शुभ दिवस<br>**३** | माघ कृ. ८ शुभ दिवस<br>(स.७.५४ नं..)<br>**१०** | माघ अमावास्या<br>दर्श अमावास्या<br>अमावास्या समाप्ती सांय. ०५.३०<br>**१७** | फाल्गुन शु. ७/८<br>जागतिक मुद्रण दिन<br>**२४** | |
| बु बुधवार | माघ कृ. ३ शुभ दिवस<br>शब्बे बारात (दु. १२.१९ प.)<br>संत नरहरी सोनार पुण्यतिथी<br>**४** | माघ कृ. ९ शुभ दिवस<br>श्री रामदास नवमी (स. १०.५२ प.)<br>वामन महाराज जन्मोत्सव सावनेर-अमरावती<br>**११** | फाल्गुन शु. १ शुभ दिवस<br>चंद्रदर्शन, फाल्गुन मासारंभ<br>सौर वसंत ऋतू प्रारंभ<br>**१८** | फाल्गुन शु. ९ शुभ दिवस<br>**२५** | |
| गु गुरूवार | माघ कृ. ४ शुभ दिवस<br>**संकष्ट चतुर्थी**<br>चंद्रोदय ०९.२२<br>**५** | माघ कृ. १० शुभ दिवस<br>(दु. १.४१ नं.)<br>**१२** | फाल्गुन शु. २ शुभ दिवस<br>गोपाळकृष्ण गोखले पुण्यतिथी<br>मुस्लिम रमजान मासारंभ<br>**छत्रपती शिवाजी महाराज जयंती** (तारखेप्रमाणे)<br>**१९** | फाल्गुन शु. १० शुभ दिवस<br>स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी<br>**२६** | |
| शु शुक्रवार | माघ कृ. ५ शुभ दिवस<br>**६** | माघ कृ. ११ शुभ दिवस<br>विजया एकादशी<br>**१३** | फाल्गुन शु. ३ शुभ दिवस<br>भारतीय फाल्गुन मासारंभ<br>**२०** | फाल्गुन शु. ११ शुभ दिवस<br>आमलकी एकादशी (स.११.३२ प.)<br>मराठी भाषा गौरव दिन<br>**२७** | |
| श शनिवार | माघ कृ. ६ शुभ दिवस<br>**७** | माघ कृ. १२ शुभ दिवस<br>शनिप्रदोष (सायं. ४.०१ प.)<br>**१४** | फाल्गुन शु. ४ शुभ दिवस<br>विनायक चतुर्थी (दु. १.०१ नं.)<br>जागतिक मातृभाषा दिन<br>**२१** | फाल्गुन शु. १२ शुभ दिवस<br>राष्ट्रीय विज्ञान दिन<br>**२८** | |

............ १
............ २
............ ३
............ ४
............ ५
............ ६
............ ७
............ ८
............ ९
............ १०
............ ११
............ १२
............ १३
............ १४
............ १५
............ १६
............ १७
............ १८
............ १९
............ २०
............ २१
............ २२
............ २३
............ २४
............ २५
............ २६
............ २७
............ २८

### या महिन्यातील करावयाची कामे

- उशिरा पेरलेल्या गव्हास पोटरी, फुलोरा व दाणे भरतेवेळी पाणी द्यावे.
- गव्हाच्या शेतातील उंदराचा बंदोबस्त करावा.
- गव्हावरील तांबेरा रोगाचे नियंत्रण करावे.
- उन्हाळी भुईमूगाची पेरणी १० फेब्रुवारीपर्यंत संपवावी.
- जानेवारीत पेरलेल्या सूर्यफुलास ३० दिवसांनी शिफारशीनुसार नत्र द्यावे.
- जानेवारी महिन्यात लावलेल्या टरबुजास हेक्टरी ५० कि. नत्र द्यावे. लाल भुंगे, फळमाशी व भुरी रोगाचे वेळी नियंत्रण करावे.
- उन्हाळी पिकास ठिबक पद्धतीने पाणी द्यावे.
- हिरव्या चाऱ्यासाठी मका, ज्वारी व बाजरी पिकाची पेरणी करावी.
- संत्रा मोसंबी व लिंबाचा आंबेबहार धरला असल्यास खताच्या मात्रा शिफारशीनुसार देऊन हलके पाणी द्यावे.
- भेंडी, गवार, चवळी, दोडका, कारली, दिलपसंत या पिकाची लागवड करावी.
- फळबागात अच्छादनाचा वापर करावा.
- मोगऱ्याची छाटणी अर्धा भाग कापून करावी.
- १५ फेब्रुवारी नंतर हंगामी ऊस लागवड करू नये तसेच खोडवा पण घेऊ नये.
- उन्हाळी मुगाची लागवड करावी.
- हंगामी ऊसाला एक महिन्यानंतर २५ कि.नत्र/हेक्टर देऊन पाणी द्यावे.
- ऊसामध्ये खोडमाशीचा प्रादुर्भाव आढळल्यास क्विनॉलफॉस २५ ईसी २० मिली १० लिटर पाण्यात मिसळुन फवारावे.
- आंबा पिकावर तुडतुड्या व भुरी रोगाचे नियत्रंण करावे.



अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी

* स्थापना : सन १९७६ * दुरध्वनी : (०२४५२) २३४१५०



टरबुज कँडी



गाजर-टोमॅटो ज्युस



जवस : बिस्कीट/कुकीज्

### महत्त्वाच्या नोंदी

# उन्हाळी तीळ: अधिक उत्पादनासाठी व्यवस्थापन

फेब्रुवारी २०२६

**डॉ.मोहन वै. धुप्पे**
गळीतधान्ये विशेषज्ञ
मो.९६२५३५२४३७१

**डॉ.शिवशंकर पं. पोले**
कनिष्ठ पैदासकार (सुर्यफुल)
मो.९४२३७५९५३५

**डॉ. संतोष वि. वाघमारे**
कनिष्ठ वनस्पती विकृती शास्त्रज्ञ (सूर्यफुल)
मो.८६६८९२१६१२

गळीतधान्ये संशोधन केंद्र, लातूर वनामकृवि, परभणी

उन्हाळी हंगामासाठी तीळ पिकाची लागवड हि १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करतात. तेंव्हा आता हे पिक फुलोरा अवस्था ते बोंड अवस्थेत आहे तेंव्हा अधिक उत्पादन मिळविण्यासाठी खालील उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

**पाणी व्यवस्थापन:**

तीळ पिकाच्या पाणी व्यवस्थापनामध्ये पिकाच्या संवेदनशील अवस्थांना फार महत्व असते. या अवस्थामध्ये जर पाण्याचा ताण पडला तर उत्पादनात अधिकाची घट संभवते. यासाठी या पिकाच्या खालील संवेदनशील अवस्थामध्ये पाण्याचा ताण पडू देवू नये.

| अ.क्र. | पिकाची अवस्था | कालावधी |
|---|---|---|
| १. | पेरणी | पेरणी नंतर लगेचच |
| २. | वाढीची अवस्था | पेरणी नंतर ३०-३५ दिवसांनी |
| ३. | फुलोरा अवस्था | पेरणी नंतर ४५-५० दिवसांनी |
| ४. | बोंड अवस्था | पेरणी नंतर ६०-७५ दिवसांनी |

**कीड व्यवस्थापन:**

**१.पिली किंवा काणे माशी:**

हि डासासारखी दिसणारी अत्यंत लहान माशी असते. मादी माशी फुलांचे कळीवर, फुलावर किंवा कोवळ्या बोंडावर अंडी घालते. अळ्या बोंडात राहून प्रादुर्भाव करतात.त्यामुळे किटकनाशके फवारण्याचा काहीही उपयोग होत नाही. किडलेली बोंडे जमा करून नष्ट केल्याने अळीचा प्रादुर्भाव कमी होतो. तसेच बिगर हंगामी तिळाची बोंडे काढून टाकावीत.

**२.गादी माशी:**

हि माशी तिळाच्या कळीत, फुलात व बोंडात अंडी घालते. या माशीची अळी फुले व बोंडाच्या आतील भाग खाते. अळी बोंडात राहत असल्यामुळे तिचा नाश करण्याचा समाधानकारक उपाय सापडलेला नाही. तेंव्हा प्रादुर्भाव ग्रस्त बोंडे जमाकरून नष्ट करावीत.

**३.तुडतुडे:**

पानाच्या खालील भाग खरवडून आतील रस शोषून घेतात त्यामुळे पान पिवळे पडून अन्नद्रव्य निर्मितीस बाधा पोहचते.

**४.मावा: *(Aphis gossypii)***

पानावरील रस शोषण करून अन्नानिर्मितीस बाधा आणतात व उत्पादनात घट येते.

**नियंत्रण:** मावा व तुडतुड्याच्या नियंत्रणासाठी डायमेथोयेट ३० टक्के प्रवाही ३० मिली किंवा थायोमेटॉन २५ टक्के प्रवाही ३० मिली किंवा मिथाईल डीमेटॉन २५ टक्के प्रवाही २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी घ्यावी.

**महत्वाचे रोग व त्याचे नियंत्रण:**

**१.पर्णगुच्छ (फायलोडी):**

ह्या रोगाचा प्रादुर्भाव फायटो-मायकोप्लाइमा मुळे प्रामुख्याने फुले येण्याचे वेळी होत असल्यामुळे तीळ उत्पादनाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या रोगाचा प्रसार तुडतुड्यामुळे
होत असल्यामुळे तुडतुड्याचे नियंत्रण करणे आवश्यक आहे. त्यासाठी डायमेथोयेट ३० मिली किंवा थायोमेटॉन ३० मिली किंवा मिथाईल डीमेटॉन २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी घ्यावी.

**२.मुळ कुज :**

मूळ कुजणे हा रोग पाणी साचणाऱ्या जमिनीत बुरशीमुळे होतो. म्हणून ह्या पिकात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच बीज प्रक्रियाही करून घ्यावी. त्यासाठी बाविस्टीन २ ग्रॅम प्रती किलो किंवा कॅप्टन २ ग्रॅम प्रती किलो वापरल्याने ह्या रोगाचे नियंत्रण चांगल्या प्रकारे होते.

**पिक पक्वतेची लक्षणे व कापणी :**

१. उन्हाळी तीळ ९० ते १०० दिवसात तयार होते.
२. जेंव्हा झाडाची बोंडे पक्व झालेली असतात पण हिरवीच असतात व झाडाची पाने पिवळसर होवून झडायला लागतात तेंव्हा पिक कापणीस तयार झाले असे समजावे व कापणी करावी.
३. कापणी शक्यतो वेळेवर करावी, पुढे ढकलू नये व बोंडे आणखीन वाळू देवू नये कारण त्यामुळे बोंडे फुटून बी जमिनीवर सांडते व उन्हामुळे बियाण्याची प्रत खालावते व त्यावरील चमक कमी होते.
४. कापणी नंतर पेंड्या बांधून ठेवाव्यात.
५. तीळ काढून बांधून उभ्या/तिरप्या रचून कोप्या करून तोंडे उघडतात २-४ दिवसांत वाळल्यानंतर कुड्याची तोंडे उमलल्यानंतर काढून कापडावर अंथरले जातात व हुलवणी केले जाते. यामध्ये एका हाताने पेंढ्या उलट्या करून हलविल्या की तीळ पडले जाते. पेंढ्या हुलविण्याची क्रिया अतिशय काळजीपुर्वक करणे आवश्यक आहे.

**काढणी पश्चायात नियोजन :**

१. स्वच्छ केलेले बियाणे वाळवून त्यातील ओलाव्याचे प्रमाण ८ टक्कया पर्यंत ठेवावे जेणे करून कीड व रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही व बियाणे उच्च प्रतीचे राहील.
२. ज्या गोण्यामध्ये माल भरून ठेवायचा आहे अशा गोण्या व गोदामे जीवाणू विरहित करावीत.
३. भरलेल्या गोण्या व गोदामे हवा बंध ठेवावीत.

**उत्पादन :**

वरील प्रमाणे उपाययोजना केल्यास उन्हाळी हंगामात ७-८ क्वीं/हे. मिळते व उत्पादनाचा दर्जा उच्च प्रतीचा राहून अधिकाचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.





* * * * * *

# रेशीम उद्योगासाठी तुती रोपवाटिका नियोजन

फेब्रुवारी २०२६

**डॉ. धिरज कदम**
प्रभारी अधिकारी
मो.७५८८६१२६२२

**डॉ. संजोग बोकन**
कृषि सहाय्यक
मो.९९२१७५२०००

**श्री. धनंजय मोहोड**
वरिष्ठ संशोधन सहाय्यक
मो.९४०३३९२११९

रेशीम संशोधन योजना, वनामकृवि, परभणी

रेशीम कीटक संगोपनासाठी लागणारा तुती पाने उत्पादनासाठी रोपवाटीकेचे फार महत्त्व आहे. महाराष्ट्रात १९,००६ एकर तुती लागवड झाली असुन प्रामुख्याने मराठवाड्यात मार्च २०२४ पर्यंत १०,३८३ एकर तुती लागवड व २,७३१मे. टन कोष उत्पादन झाले आहे. तुतीचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत असून येणाऱ्या काळात तुती रोपांची मागणी वाढणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रोपवाटिकेची नियोजन करणे गरजेचे आहे.

**तुती रोपवाटीका कालावधी :**

- ज्या शेतकऱ्यांना जून ते सप्टेंबर या दरम्यान तुती लागवड करायची आहे त्यांनी १५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण होईल रोपवाटिकेचे नियोजन करावे.
- ज्यांना डिसेंबर ते जानेवारी मध्ये लागवड करायची आहे त्यांनी सप्टेंबर महिन्यात रोपवाटिकेची नियोजन करने गरजेचे आहे.

**➢ बेड (गादी वाफे ) करणे :**

- सपाट व पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीची निवड करावी.
- दोन ते तीन वेळा जमिनीची नांगरट करून शेतातील ढेकळे फोडून काडी कचरा स्वच्छ करून बेड करावेत.
- गादी वाफे करताना दोन भाग मातीमध्ये मुरलेले शेणखत मिसळावे. गादी वाफे ८२ फुट लांब व ४ फुट रुंद आकाराचे ४ बेड करावेत.
- ३ ते ४ महिने वयाची रोपे पाहिजे असतील तर दोन रोपात १० सेंमी व दोन ओळीत २० सेंमी अंतर असावे. प्रत्येक बेड भोवती १.५ फुट रुंद पाण्यासाठी सरी करून घ्यावी. एक एकर तुती लागवड पट्टा पद्धतीने ५ x ३ x २ फुट अंतरावर करण्यासाठी ५५५५ रोपे लागतात.

**गादी वाफ्यावरील तुती रोपे**



**➢ बेणे निवड व लागवड :**

- बागायतीसाठी व्हि-१ व कोरडवाहूसाठी एस-१३ या तुतीच्या वाणाची बेणे निवड करावी.
- बेणे निवडीसाठी तुतीचे वय ७ ते ८ महिने असणे आवश्यक आहे. बेण्याची जाडी पेन्सिल आकाराची असावी.
- शेंड्याकडील कोवळ्या हिरव्या कांड्या बेण्यासाठी वापरू नये. ३ ते ४ डोळे असलेले करड्या रंगाचे बेणे निवडावे.
- सिकेटरच्या साहयाने डोळ्याच्या वरच्या बाजूने सरळ व तीन डोळ्यानंतर खालच्या बाजूने थोडा तिरपा काप घ्यावा. २२ ते २५ सेंमी लांबीचे बेणे करताना साल फाटणार नाही याची काळजी घ्यावी.
- तुती बेणे तयार केल्यानंतर लगेच कार्बेन्डाझीम ५० डब्लूपी ०.२ टक्के बुरशीनाशक प्रती १० लिटर पाणी द्रावणात मिश्रण करून१० ते १५ मिनिटे बुडवून नंतर लगेच बेडवर लागवड करावी.
- २ ते ३ दिवसांनी लागवडीसाठी लांब ठिकाणी बेणे लागत असल्यास ओल्या गोणपाटात गुंडाळून वाहतूक करावी. फाद्यांचा गठ्ठा बांधुन घेऊन जावा व लागवड करण्याच्या ठिकाणी बेणे तयार करावे.
- गादी वाफ्यावर एकच बेणे वापरून दोन डोळे जमिनीत व एक डोळा जमिनीच्या वर राहील अशी लागवड करावी. लागवड केल्यानंतर लगेचच पाणी द्यावे.
- रोपवाटिकेस सुपीक काळी जमीन असल्यास ७ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. एक महिन्याच्या अंतराने खुरपणी करून तण नियंत्रण करावे. दोन महिन्यानंतर ५०० ग्राम युरिया प्रति बेड प्रमाणे देऊन हलकेसे पाणी द्यावे.

**➢ तुती बागेची वैशिष्ठ :**

- तुती लागवड केल्यानंतर १५ वर्षापर्यंत टिकते. प्रत्येक वर्षी पुर्नलागवड करण्याची गरज नाही.
- रोपांची लागवड केल्यापासून ३ ते ४ महिन्यात तुती पाला रेशीम कीटकास टाकण्या योग्य होतो. कमी पाण्यात तुती झाडे जगत असल्यामुळे उन्हाळ्यात पाणी उपलब्ध नसल्यास १ ते २ महिन्यांनी पाणी मिळाल्यास तुती बाग पुन्हा उगवते.
- ठिबक सिंचन केल्यास प्रति हेक्टर झाडांची संख्या टिकते, तूट होत नाही.
- किटक संगोपन झाल्यानंतर तुती बागेत उरलेला तसेच किटकांनी खाऊन उरलेला पाला जनावरांना किंवा गांडूळ खत कंपोस्टसाठी वापरता येतो.







- नेसर्गिक आपत्ती जास्त पाऊस किंवा ढगफुटी झाल्यास जास्त नुकसान होत नाही.
- तुती बाग व किटक संगोपनसाठी कुटूंबातील व्यक्तींना म्हणजे पुरुष, महिला व वृद्ध अपंग मिळून हेक्टरी १६ लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

**➢ तुती रोप काढणी व लागवड :**

- गादी वाफ्यावर बेणे लावल्यापासून ३ महिन्यात रोपांची वाढ ३ फुट होते.
- तयार झालेली रोपे लागवडीसाठी बेडवरून काढण्याच्या १ ते २ दिवस अगोदर बेडला पाणी द्यावे. जेणेकरून रोपे काढतांना रोपाच्या मुळास इजा होणार नाही.
- रोपांची वाहतूक करायची झाल्यास सकाळी किंवा सांयकाळी करावी.
- जमीन नांगरणी करून शेणखत टाकून पट्टा पद्धतीने ५ x ३ x २ किंवा ६ x ३ x २ वर लागवड करावी. यंत्राच्या साह्याने अंतर मशागतीचे कामे करणे सोपे होते तसेच उच्च प्रतीचा तुती पाला तयार होतो.



* * * * * * *